


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १७९ वा शनिवार दि ३ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जरांगे पाटील इफेक्ट सरकारने घेतला दुसरा महत्त्वाचा निर्णय; कुणबी प्रमाणपत्राबाबत मराठ्यांना मोठा दिलासा...

वृत्तसंस्था/मुंबई

मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावं, यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू केलं असून या उपोषणामुळे राज्य सरकारची कोंडी झाली आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी सरकारने हालचाली सुरू केला असून राज्यातील मराठा समाजातील पात्र लोकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली वंशावळ समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीला ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य सरकारकडून आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने काढला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा समाजातील व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्रे काढणे सोपे व्हावे, यासाठी ही समिती गठीत करण्यात




आली होती. या समितीच्या कार्यकाळाला यापूर्वी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आला होता. दरम्यान, तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ ३० जून २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे असून सदर समितीला २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील, असं नव्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलं आहे.

# राजकीय पोळी भाजू नका; मराठा आंदोलनवरुन फडणवीसांचा विरोधकांना इशारा



वृत्तसंस्था/मुंबई

मराठा समाजाच्या मागणीवर राज्य सरकार सकारात्मक आहे. या मागण्यांबाबत सरकार मराठा समाजाच्या पाठीशी आहे. परंतु, काही लोकांकडून मराठा आणि ओबीसी समाजात भांडण लावण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा प्रकारे आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका. यातून तुमचे तोंड भाजेल,फ असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विरोधकांना दिला. त्याच वेळी त्यांनी मराठा समाजाच्या मागणीवर कायदेशीर भूमिका घेण्याचे आवाहन विरोधी पक्षाला केले. मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा समाज मुंबईत एकवटला आहे. एखाद्या निर्णयाचा परिणाम दीर्घ काळ असतो. त्यामुळे असे निर्णय सर्वसमावेशक आणि चर्चेतून घ्यायचे असतात. लोकांना एकमेकांसमोर झुंजवणे आणि प्यादे लढवणे हे या सरकारचे धोरण नाही,फ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. सध्या वेगवेगळे पक्ष सोयीची भूमिका घेत आहेत. त्यांना आवाहन आहे, की भूमिका घ्यायची असेल तर ठाम भूमिका घ्या. मात्र, हे पक्ष ठाम भूमिका घेताना दिसत नाहीत. विरोधी पक्ष आरक्षणावर कायदेशीर भूमिका सांगणार नाहीत. कारण त्यांना समाजा-समाजात भांडण होताना राजकीय फायद्याचा वास येतो. आम्हाला राजकीय फायदा करून घ्यायचा नाही. आम्हाला सगळे समाज सांभाळायचे आहेत,फ असे फडणवीस म्हणाले. ङ्गमराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मागच्या काळात सर्वपक्षीय बैठकीत ठराव करून सह्या घेतल्या आहेत. त्यांची भूमिका त्या पत्रातून बाहेर आली आहे. त्यामुळे आता सोयीची भूमिका घेणे आणि लोकांची दिशाभूल करणे थांबवले पाहिजे. महाराष्ट्राची सामाजिक वीण कशी नीट ठेवता येईल यासाठी प्रयत्न करावा लागणार आहे,असे ही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# ...अनिच्छुक भागीदार...

भारत आणि चीन या दोन देशांनी आपल्या मैत्रीची पंचाहत्तरी नुकतीच साजरी केली असली तरी गेल्या पाच वर्षांतील खाचखळगे भरून काढायला वेळ लागतोय! सीमावादामुळे एकमेकांशी दीर्घ काळ तणावपूर्ण संबंध असलेले हे दोन्ही देश आता हळूहळू नाते सुधारण्याच्या दिशेने पावले टाकत आहेत. यामागचे मोठे कारण म्हणजे अमेरिकेच्या व्यापारधोरणातून निर्माण झालेला दबाव. अमेरिकेने भारतीय निर्यातीवर लादलेले मोठे शुल्क (टेरिफ) हे भारत-चीन संबंधांच्या संदर्भाला नवे वळण देईल का, या शुल्कांमुळे का होईना; पण या दोन प्रचंड आशियाई सत्ता मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करतील का? याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. अमेरिकेने सुमारे ४८.२ अब्ज डॉलरच्या भारतीय मालावर ५० टक्के शुल्क लादले आहे. त्यामुळे अमेरिकेसोबतचा भारताचा निर्यात बाजार मोठ्या प्रमाणात ढासळला असून, भारताला व्यापाराचे विविधीकरण आणि पर्यायी भागीदार शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि चीन यांच्यातील संबंधांनी जवळीक साधण्यास सुरुवात केली आहे. सीमेवरील गस्त व्यवस्थेचे पुनर्संचालन, दोन्ही देशांदरम्यान थेट विमान उड्डाणे, चिनी पर्यटकांसाठी व्हिसा सुरू करणे तसेच कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करणे ही पावले संबंध सुधारण्याची चिन्हे आहेत. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांचा नुकताच झालेला भारत दौरा हा नव्या राजनैतिक संवादाचा स्पष्ट संकेत होता. याच महिन्याअखेरीस पंतप्रधान मोदी चीनला भेट देणार आहेत. या औपचारिक राजकीय भेटींमध्ये सीमेवर शांतता, व्यापारसुलभता आणि बहुपक्षीय सहकार्य यांवर भर आहे. भारत आणि चीन यांचे ऐतिहासिक नातेसंबंध असूनही, आजचे त्यांचे नाते मात्र गुंतागुंतीचेच म्हणावे लागेल. एकत्र काम करण्याच्या संधी आहेतच, पण तणावही कमी झालेला नाही. सीमावाद हे तणावाचे मुख्य कारण. १९६२पासून सुरू झालेला हा सीमावाद, डोकलाम आणि गलवान खोऱ्यात झालेल्या चकमकींमुळे आणखीनच बळावला. अनेक लष्करी आणि राजनैतिक चर्चा होऊनही निर्णायक तोडगा निघालेला नाही. सीमा संबंधातला अविश्वास कायम असला तरी दोन्ही देश, अमेरिकन व्यापार दडपशाहीला विरोध, रशियाकडून ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करणे आणि आर्थिक परस्परपूरकतेचा शोध घेणे यांतच सामाईक हितसंबंध आहेत हे ओळखून आहेत. न जाणो, अमेरिकेचे हे पाऊल भारत-अमेरिका भागीदारी कमकुवत करत भारत आणि चीनला सावध; परंतु व्यावहारिक सहकार्याच्या दिशेने ढकलू शकते. विरोधाभास असा, की राजकीय तणाव आणि चिनी मालावर / आयातीवर बंदी असूनही दोन्ही देशांतील व्यापाराने १०० अब्ज डॉलरचा आकडा कधीच ओलांडला आहे! चीनवर कितीही बंदी घातली तरी तिथल्या वस्तूंची आयात काही कमी झालेली नाही. शेवटच्या १० अब्ज डॉलरची वाढ तर करोना काळात झालेली आहे. परंतु, ही जवळीक म्हणजे दोन्ही देशाच्या संबंधांनी सकारात्मक आघाडी घेतली, असे समजणे चुकीचे ठरेल. भारत आणि चीन अद्यापही धोरणात्मक स्पर्धक आहेत. भारत आणि चीन यांच्यात आपल्या शेजारी देशांवर वर्चस्व गाजवण्याची स्पर्धा देखील तितकीच तीव्र आहे. चीनच्या ङ्बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हफ तसेच पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ आणि मालदीवमध्ये मोठ्या गुंतवणुकीमुळे भारताला रणनैतिक धोका संभवतो. याला उत्तर म्हणून भारत जपान आणि ऑस्ट्रेलियासोबत ङ्क्वाडफ या गटाद्वारे संबंध दृढ करत आहे. ही चढाओढ हिमालयापासून हिंदी महासागरापर्यंत पसरली आहे. सध्या तरी दोन्ही देश अमेरिकेच्या आर्थिक दबावाला सामोरे जात आहेत. चीन अनेक वर्षांपासून अमेरिकी शुल्काचा लक्ष्य आहे, तर आता भारतालाही त्याचा अनुभव येतो आहे. आणि हाच अनुभव दोन्ही देशांसाठी ब्रिक्स तसेच शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनसारख्या बहुपक्षीय मंचांवर सहकार्याची संधी निर्माण करण्यासाठी उपयोगी ठरतो आहे. अमेरिकेने भारतीय निर्यातीवर लादलेले शुल्क भारतासाठी मोठे आव्हान ठरले आहे. त्यामुळे पर्यायी बाजारपेठा शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याचबरोबर, रशियन तेल खरेदीसाठी भारत आणि चीन एकाच मंचावर आहेत. बीजिंगसाठी भारताशी नाते शिथिल करण्यामागे अमेरिकेची आशियातील पकड कमकुवत करण्याचा हेतू आहे; तर भारतासाठी चीनसोबतचे मर्यादित सहकार्य हे धोरणात्मक स्वायत्ततेचे प्रतीक आहे आणि अमेरिकेवरचे अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न आहे. आगामी वाटचाल अनिश्चिततेने भरलेली आहे. दोन्ही देशांतील सीमावादावर संपूर्ण तोडगा निघालेला नाही. ही समस्या अजूनही ज्वलंत आहे आणि तेवढीच धोकादायक देखील. ङ्ऑपरेशन सिंदूरफच्या वेळी पाकिस्तानबरोबर चीनची मैत्री भारतासाठी चिंतेची बाब ठरली. तसेच, चीनमध्ये अधिक आर्थिक गुंतवणूक करणे म्हणजे त्यांच्यावर जास्त अवलंबित्व ही देखील भीती आहेच. आणि म्हणूनच चीनबरोबरची ही जवळीक हातमिळवणीपेक्षा एक धोरणात्मक बचावाच्या दृष्टिकोनातून होत आहे, असे वाटते. शुल्काच्या संकटाने, आशिया खंडातील ही दोन शक्तिमान राष्ट्रे काही बाबतीत एकत्र येण्याचा तयारीत आहेत, आणि हीच हातमिळवणी अमेरिकेसाठी एक संकेत आहे. चीनसाठी भारताशी मैत्रीपूर्ण संबंध म्हणजे अमेरिकेला रोखण्याची संधी आणि भारतासाठी अमेरिकेला, आम्ही आमचे भागीदार पाश्चिमात्य दबावाशिवाय निवडू शकतो हे दाखवून देण्याची संधी, आणि दोन्ही देशांसाठी जगातील एक महत्त्वपूर्ण द्विपक्षीय संबंध स्थिर करण्याची संधी आहे.




## अवैध वाळूचे दोन ट्रक पकडले! तब्बल ५०,८०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई!

**जनसंचलन/ चिखली**



जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या आदेशाने अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे.दरम्यान चिखली हद्दीत पथक गस्त घालत असताना,अवैध ८ ब्रास वाळूचे विना परवाना दोन ट्रक जप्त केले आहे. ८०,००० रुपये किंमतीची वाळू व ट्रक असा ५०,८०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. चिखली पोलीस स्टेशन हद्दीत २८ ऑगस्ट रोजी मलगी फाट्या नजीक दोन ट्रक विना परवाना अवैध वाळू वाहतूक करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. दरम्यान सदर वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकला नाकेबंदी करून झाडाझडती घेतली असता, दोन्ही ट्रकमध्ये ८०,००० रुपये किमतीची ८ ब्रास वाळू आढळून आली. ट्रक व वाळू असा एकुण ५०,८०,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी विरोधात कलम ३०३ (२) बीएनएस सहकलम २१(१),२१(२) गौणखनिज अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई एएसआय राजकुमार राजपूत, ओमप्रकाश सावळे,एचसी गजानन दराडे, जगदेव टेकाळे, दिगंबर कपाटे, वनिता शिंगणे, दीपक वायाळ या पथकाने केली.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# केस कापून थकाल पण वाढ काही थांबणार नाही, किचमध्येच लपलाय उपाय, काही मिनिटांत होणाऱ्या या ट्रिकचा रिझल्टही जबराट





पावसाळा असो, उन्हाळा असो की हिवाळा आपल्या केसांचं सौंदर्य मात्र टिकून रहावं अशी प्रत्येकाची इच्छा असते. लांबसडक, घनदाट आणि काळेभोर केस ही अनेकांसाठी एक स्वप्नवत गोष्ट असते. पण आजच्या काळात प्रदूषण, ताणतणाव, अनियमित जीवनशैली, चुकीचा आहार आणि रासायनिक उत्पादने यामुळे केस गळणे, अकाली पांढरे होणे किंवा कमकुवत होणे या समस्या वाढताना दिसतात. अनेक जण महागडे तेल, शॅम्पू, सीरम वापरून केसांच्या समस्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात, पण हे उपाय तात्पुरते ठरतात.त्यामुळे नैसर्गिक आणि घरगुती उपायांकडे वळणं अधिक परिणामकारक ठरतं. अगदी आपल्या स्वयंपाकघरातही काही असे घटक आहेत जे केसांसाठी वरदान ठरू शकतात. त्यापैकीच एक आहे मोहरीचं तेल. हे साधं दिसणारं तेल केसांसाठी नैसर्गिक टॉनिकसारखं काम करतं. जर त्याचा योग्य पद्धतीने आणि सातत्याने वापर केला तर केस पुन्हा दाट, चमकदार आणि मजबूत होऊ शकतात.

**केसांना पोषण देणारे मोहरीचे तेल**

मोहरीच्या तेलात नैसर्गिक घटक असतात जे थेट केसांच्या मुळाशी पोहोचून त्यांना पोषण देतात. हे तेल टाळूमध्ये रक्ताभिसरण वाढवण्यास मदत करतं, ज्यामुळे केसांच्या मुळांना बळकटी मिळते. यामुळे केस गळणे कमी होते आणि नवीन केस उगवण्याची प्रक्रिया वेगाने सुरू होते. या तेलाचा वापर डोक्यातील कोंडा आणि इन्फेक्शन कमी करण्यासाठीही केला जातो. सतत वापरल्यास केसांना नैसर्गिक काळेपणा मिळतो आणि त्यांचा शाइनिंग लूक टिकून राहतो

**कडीपत्त्याच्या मिश्रणाने केसांची मजबुती**

केवळ मोहरीच्या तेलानेच नाही तर त्यात कडीपत्ता मिसळल्यास त्याचा फायदा दुप्पट वाढतो. कडीपत्ता केसांच्या मुळांना ताकद देतो, टाळूला पोषण पुरवतो आणि अकाली पांढरे होणं टाळतो. मोहरीच्या तेलात कडीपत्ता टाकून तयार केलेलं मिश्रण केसांसाठी एक प्रभावी औषधासारखं काम करतं. यामुळे केस दीर्घकाळ काळेभोर, निरोगी आणि दाट राहतात

**तेल वापरण्याची योग्य पद्धत**

मोहरीचं तेल वापरण्यापूर्वी ते हलकं गरम करून त्यात ७-८ ताजे कडीपत्त्याची पानं टाका. हे मिश्रण थंड झाल्यावर त्याने केसांना सौम्य मसाज करा. अशा प्रकारे केलेल्या मसाजमुळे पोषण थेट मुळांपर्यंत पोहोचतं. सातत्याने वापरल्यास केस गळणे थांबतं आणि नव्या केसांची वाढ जलद गतीने होते.

**मालिशीनंतरची काळजी**

मोहरीचं आणि कडीपत्त्याचं तेल डोक्याला लावल्यानंतर ते किमान दोन तास केसांमध्ये राहू द्या. त्यानंतर सौम्य शॅम्पूने केस धुवा. ही प्रक्रिया आठवड्यातून दोन ते तीन वेळा केली तर केस नैसर्गिक काळेपणाने टिकून राहतात. तसेच अकाली केस पांढरे होण्याची समस्या कमी होते.

**अजून एक उपाय**

मोहरीच्या तेलाचा हा उपाय डॉक्टर मनोज दास यांनी सांगितला असून यासाठी मोहरीचं तेल, काळे तीळ व अमरवेल या तीनच गोष्टी लागणार आहेत. अमरवेल ऑनलाईन सुद्धा मिळते. मोहरीच्या तेलात काळे तीळ कुटून बारीक पावडर करून घाला त्यातच अमरवेल घाला. आता हे तेल तीळ आणि आमरवेल जळून काळं पडत नाही तोवर गरम करा. थंड झाल्यानंतर हे तेल एका बाटलीत भरा. आठवड्यातून २ ते ३ वेळा हे तेल लावून रात्रभर तसेच ठेवा. काहीच दिवसांत केस खूप वाढतील

# शाळेबाहेर गाठलं, तिचा बोलण्यास नकार अन् त्याने तिला संपवलं

## नागपुरात विद्यार्थिनीच्या हत्येने खळबळ



**नागपूर:** उपराजधानी नागपूर शुक्रवारी दुपारी पुन्हा एकदा गुन्ह्याच्या घटना हादरली. अजनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गुलमोहर नगर परिसरात एका अल्पवयीन मुलाने १६ वर्षीय विद्यार्थिनीवर चाकूने वार करून तिची हत्या केली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मृत विद्यार्थिनी ही सेंट अँथनी स्कूल, गुलमोहर नगर येथे दहावी इयत्तेत शिकत होती. आरोपी देखील अल्पवयीन असून तो इमामवाडा परिसरात राहतो. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या तीन वर्षांपासून आरोपी आणि मृत विद्यार्थिनी यांच्यात ओळख आणि प्रेमसंबंध होते. मात्र, काही महिन्यांपासून त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला होता. त्यामुळे विद्यार्थिनीने आरोपीशी बोलणं बंद केलं होतं. यामुळे संतप्त होऊन त्याने हा टोकाचा निर्णय घेतल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे.याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (२९ ऑगस्ट) दुपारी सुमारास तीन वाजताच्या दरम्यान एंजल शाळा सुटल्यावर ही विद्यार्थिनी बाहेर आली. त्याचवेळी आरोपी तिच्याजवळ आला आणि तो तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करु लागला.

मात्र, मुलीने त्याच्याशी बोलण्यास नकार दिल्याने आरोपीने तिच्याशी वाद घातला. त्यानंतर अचानक त्याने चाकू काढला आणि तिच्यावर एकामागून एक वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली विद्यार्थिनी जमिनीवर कोसळली आणि आरोपी घटनास्थळावरून पळून गेला.शाळेच्या परिसराबाहेरच ही धक्कादायक घटना घडल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. शाळेच्या प्राचार्यांनी तात्काळ अजनी पोलिसांना घटनेची माहिती दिली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी जखमी अवस्थेतील विद्यार्थिनीला सरकारी वैद्यकीय रुग्णालयात दाखल केले.

मात्र, तेथे डॉक्टरांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी आले. क्राईम ब्रांच आणि अजनी पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी वेगवेगळ्या पथकांची स्थापना केली असून तो अद्याप फरार असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. या घटनेमुळे नागपूरमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. दिवसाढवळ्या झालेल्या या निर्घृण हत्येमुळे कायदा व सुव्यवस्था, तसेच विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नागपूरच्या भोसले घराण्याचे वंशज मुधोजी राजे यांचा मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यास विरोध,

**नागपूर:** मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मुंबईत मनोज जरांगे-पाटील आंदोलन करत असताना ङ्कसमाजाला ओबीसीतून आरक्षण नको आहे, मराठा समाजाला वेगळ्या प्रवर्गातून आरक्षण द्याफ, अशी भूमिका नागपूरच्या भोसले घराण्याचे वंशज मुधोजी राजे भोसले यांनी घेतली आहे. मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत आरक्षण हवे आहे, त्यासाठी ओबीसीतून आरक्षण देण्याची गरज नाहीफ, असे मुधोजी राजे भोसले यांनी स्पष्ट केले. ङ्कजरांगे पाटील यांच्या आंदोलनाला शुभेच्छा आहेत;





मात्र ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्यास आम्ही विरोध करतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात जे काम केले, ते कौतुकास्पद आहे. आता न्यायालयात टिकेल, असेच आरक्षण मराठा समाजाला हवे आहे, आणि त्यावर मराठा समाज ठाम आहे. आम्ही मराठा आहोत, त्याचा अभिमान आहे. आम्ही देणारे आहोत, अशा स्थितीत कोणाचा अधिकार हिसकावून आरक्षण घेण्याचा प्रश्न येत नाहीफ, असे भोसले म्हणाले.दरम्यान, जरांगे यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा समाज बांधवांनी आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे सरकार जरांगेंच्या मागण्यांवर काय निर्णय घेते याकडे समाजाचे लक्ष लागले आहे. त्याचबरोबर या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघाकडूनही नागपुरात आज, शनिवारपासून संविधान चौकात आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. त्यांनी आज मराठा आंदोलकांसह मुंबई गाठलं आणि मुंबईच्या आझाद मैदानात आज सकाळपासून मनोज जरांगेंच्या उपोषणाला सुरुवात झाली आहे. मुंबई मराठा आंदोलकांचा जनसागर उसळला आहे. आझाद मैदान मराठ्यांनी भरला आहे. दरम्यान, पोलिसांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला आणखी एक दिवसाची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे उद्याही हे उपोषण सुरु राहिल. तर, मनोज जरांगे यांनी सरकारकडे मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

# जरांगेंनी स्क्रिप्ट फोडली, सरकार उलथवण्यासाठी सत्ताधारी आमदारच...

## दादांचं नाव घेत लक्ष्मण हाकेंचा खळबळजनक आरोप

**पुणे :** यांनी आझाद मैदानावर आपल्या उपोषणाला सुरुवात केली आहे. या आंदोलनासाठी मनोज जरांगेंचे समर्थक यांच्यासह मोठ्या संख्येने मुंबईला आले आहेत. त्यामुळे संपूर्ण मुंबई जाम झालेली पाहायला मिळाली. जरांगे यांनी सर्वांना वाशीला जायला लावत मुंबई खाली करायला लावली. तर उपोषण सुरू होताच अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके, विजयसिंह पंडित यांची भेट घेतली. याच पार्श्वभूमीवर बोलताना लक्ष्मण हाके यांनी थेट उपमुख्यमंत्री यांच्यावर निशाण साधला आहे. मनोज जरांगे यांनी मुंबईला निघताना हा राजकीय अजेंडा असल्याची स्क्रिप्ट फोडली, जरांगे म्हणाले देवेंद्र फडणवीसांचं सरकार उलथवण्यासाठी, आम्ही आजपर्यंत म्हणायचो विरोधी पक्ष सामील असेल, पण मी आता जबाबदारीने सांगतो. सरकार उलथवण्यासाठी विरोधी पक्षाचे जसे आमदार, खासदार सामील आहेत तसेच अजित पवारांचे आमदार, खासदारही यामध्ये सामील आहेत. हे मी जबाबदारीने सांगत आहे, असं म्हणत हाकेंनी थेट अजित पवार यांच्यावर निशाणा साधला.दरम्यान, मंत्रिमंडळामध्ये






मांडीला मांडी लावून बसणारे अजित पवार ज्या दिवशी जरांगेकडून आई-माई काढली गेली, याच्याशी सहमत आहेत का? तुम्ही कायद्याचं आणि संविधानाचं बोला, ज्यांनी या आंदोलनाला पाठिंबा त्यांना ओबीसी आंदोलनाचं काय करायचं? अजित पवार यांचे आमदार जरांगेंना पाठिंबा देत आहेत म्हणजे अजित दादाही त्यांना पाठिंबा देतायेत. मुख्यमंत्रांना ते अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत आहेत असाच त्याचा अर्थ निघतो. आम्हालाही आता सज्ज झालं पाहिजे, सरकार जरांगे सारख्या माणसाला पायघड्या घालत असेल तर आम्हालाही भूमिका घ्यायला पाहिजे, यांनी म्हटलं आहे.जरांगे नावाच्या चेहऱ्याआडून या महाराष्ट्रामध्ये आमदार खासदार सरकार अस्वस्थ आणि बदण्याचा प्रयत्न करतायेत. आरक्षण हा विषय नाही, जरांगे यांची ही मागणी मान्य झाली तर महाराष्ट्रातील ओबीसींचं आरक्षण संपलं असेल, असेओबीसींचं आरक्षण हे शासन, राज्यकर्त्यांपासून संरक्षण मिळण्यासाठी आहे. ज्यांच्यापासून हे संरक्षण पाहिजे तेच लांडगे या कळपात घुसले तर या मेंढरांचं काय होईल? आमदार, खासदार, शरद पवार, अजित पवार, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, काँग्रेसचे नेते याची कल्पना असायला हवी. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला रसद सर्व पक्षीय आमदारांनी पुरवली, ओबीसींचं आरक्षण संपवणे हा एकमेव कार्यक्रम आहे. पन्नास टक्के ओबीसी एकत्रित झाला तर तुमचं काय होईल? सर्वांची एकी करणं अवघड आहे याची आम्हाला कल्पना असल्याचं हाके म्हणाले


# २५ वर्षीय कॉम्प्युटर इंजिनिअरने आयुष्य संपवलं

**नाशिक :** ङ्कमी माझ्या भावनांना कंटाळलो आहे. सामान्य व्यक्तीसारखं जगू शकलो नाही. कुटुंबासाठी काही करू शकलो नाही. माझ्या मृत्यूसाठी कोणीही जबाबदार नाहीफ अशा हळव्या शब्दांत शेवटची चिठ्ठी लिहून अवघ्या पंचवीसाव्या वर्षी एका कॉम्प्युटर इंजीनिअरने जीवन प्रवास संपवले. नाशिकच्या सिडको परिसरात गुरुवारी दिनांक २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडलेल्या या घटनेने कुटुंबीय, मित्र परिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.यश वसंत कोलते, रा. दत्त मंदिर चौक, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक, असे या तरुणाचे नाव आहे. मूळचा जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील असलेला यश गेल्या दहा महिन्यांपासून नाशिक येथील एका आयटी कंपनीत कार्यरत होता. शिक्षणासाठी तो काही वर्षांपासून नाशिकमध्ये वास्तव्यास होता. गेल्या दोन दिवसांपासून तो कंपनीत न गेल्याने मित्रांनी चौकशी केली. त्यानंतर नातेवाइक गणेश नाफडे यांनी घराचा दरवाजा उघडला असता यशने गळफास घेतल्याचे आढळून आले. तत्काळ त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.यशच्या पॅन्टच्या खिशात सुसाइड नोट मिळून आली असून, त्यात नैराश्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. ङ्कमला नेहमीच चिंता आणि काळजी वाटते. मी सामान्य व्यक्तीसारखं जगू शकलो नाही. सर्वांनी मला माफ करावं,फ अशी चिठ्ठी त्याने लिहिली आहे.या घटनेची नोंद अंबड पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली असून, हवालदार गुंड पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, यश कोलते याचा अंत्यविधी मूळ जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे शुक्रवारी सायंकाळी करण्यात आला.



# पीरियड्समधील वेदना, सांध्यांमधील गोळे दूर करण्यासाठी हे लाल फळ ठरतं चमत्कारी...


स्त्रियांच्या आयुष्यातील प्रत्येक महिन्यात एक असा काळ येतो जो त्यांना नकोसा वाटतो. तो काळ म्हणजे पाळीचा काळ होय. या काळात थकवा, पोटदुखी, पाठदुखी, अंगदुखी, सूज, मनःस्थितीतील बदल यांचा सामना जवळपास प्रत्येक महिलेला करावा लागतो. शरीरात कमकुवतपणा जाणवतो आणि दैनंदिन कामांवर परिणाम होतो. त्यामुळे या काळात स्त्रियांनी आपल्या आहारात असे अन्नघटक नक्की सामील करावेत जे ऊर्जा देणारे, रक्तवाढ करणारे आणि हार्मोन्स संतुलित ठेवणारे असतील. आधुनिक औषधे किंवा सप्लिमेंट्स उपलब्ध असले तरी निसर्गात असे अनेक पदार्थ आहेत जे सहज उपलब्ध, सुरक्षित आणि प्रभावी ठरतात. त्यापैकीच एक महत्वाचा आणि सुपरफूड मानला जाणारा घटक म्हणजे बीट!बीट केवळ कंदमूळ नसून महिलांसाठी एक नैसर्गिक औषध मानले जाते. विशेषतः पाळीच्या काळात याचा समावेश आहारात केल्यास शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. रक्तक्षयाची समस्या टाळण्यापासून ते हार्मोन्सचे संतुलन राखणे, स्नायूंना आराम देणे आणि त्वचेपर्यंत नैसर्गिक तजेला आणणे हे सर्व फायदे बीट देऊ शकते. चला तर मग पाहूया, पाळीच्या दिवसांत बीट




खाल्ल्याने महिलांना मिळणारे पाच मोठे फायदे कोणते आहेत. पाळीच्या वेळी पोटात व कमरेत होणारी तीव्र वेदना अनेकदा असह्य वाटते. बीटमध्ये मॅग्नेशियम आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात असतात. हे खनिज स्नायूंना रिलॅक्स करतात आणि वेदना कमी करण्यात मदत करतात. तसेच, शरीरातील अतिरिक्त पाणी बाहेर टाकण्यास मदत करून बीट सूज आणि ब्लोटिंगची समस्या कमी करतं. त्यामुळे मासिक पाळीतील त्रास नैसर्गिक पद्धतीने कमी करण्यासाठी बीट आहारात नक्की समाविष्ट करावं.या काळात स्त्रियांना सतत अशक्तपणा जाणवतो. कारण शरीरातून रक्तस्राव होतो आणि हिमोग्लोबिन कमी होण्याचा धोका वाढतो. बीटमध्ये लोह आणि व्हिटॅमिन मोठ्या प्रमाणात असतात. लोह रक्तवाढीसाठी तर व्हिटॅमिन लोह शोषणासाठी उपयुक्त ठरतं. या दोन्हींच्या संयोगामुळे हिमोग्लोबिन वाढतं आणि शरीराला नवीन ऊर्जा मिळते. त्यामुळे सतत थकवा जाणवणाऱ्या महिलांसाठी बीट हा नैसर्गिक उर्जेचा स्रोत आहे. बीटमध्ये बेटालाइन्स नावाचं विशेष पिगमेंट आणि भरपूर फायबर असतं. हे घटक यकृताला शुद्ध ठेवण्यात आणि रक्त शुद्धीकरणात मोठी भूमिका बजावतात. त्यामुळे पाळीच्या काळात शरीरात तयार होणारे टॉक्सिन्स बाहेर टाकले जातात. बीटसोबत लिंबू खाल्ल्यास हा डिटॉक्स इफेक्ट दुप्पट वाढतो. त्यामुळे शरीर हलकं, ताजंतवानं वाटतं.मूड स्विंग्स, चिडचिड, डोकेदुखी हे सर्व हार्मोनल असंतुलनामुळे घडतं. बीट खाल्ल्याने हार्मो न बॅलन्स करण्यास मदत मिळते. विशेषतः बीटसोबत तिळाचे दाणे खाल्ले तर शरीराला लिग्नान्स व हेल्दी फॅट्स मिळतात जे हार्मोन संतुलन राखतात. यामुळे मानसिक स्वास्थ्य सुधारतं, मूड चांगला राहतो आणि पाळीच्या दिवसांत ताण कमी होतो.


## आशिया कप २०२५ आधी मोठा निर्णय; गौतम गंभीरचा मोठा डाव; दोन खेळाडूंना थेट संघातून बाहेर काढलं

**मुंबईः** पुढील महिन्यात आशिया कप २०२५ च्या स्पर्धेची सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. या स्पर्धेत अनेक नवीन खेळाडूंना संधी मिळालेली दिसत आहे. यापूर्वी देशांतर्गत स्पर्धा रंगल्या जाणार असून यासाठीही संघ जाहीर झाला आहे. आता दुलीप ट्रॉफी स्पर्धा सुरु असून त्याबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. यावेळी ही स्पर्धा झोनल फॉरमॅटमध्ये खेळवली जात आहे. हा सामना नॉर्थ झोन विरुद्ध ईस्ट झोन आणि सेंट्रल झोन विरुद्ध ईस्ट झोन यांच्यात खेळला जात आहे. आता दोन्ही संघाच्या कर्णधाराबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे.सेंट्रल झोनचा कर्णधार ध्रुव जुरेल आणि ईस्ट झोनचा कर्णधार अभिमन्यू ईश्वरन दुलीप ट्रॉफीच्या पहिल्या फेरीत खेळत नाहीत. याचे कारणही समोर आले आहे. दोन्ही कर्णधार अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त नाहीत. जुरेलला सामन्यापूर्वी पाठीला दुखापत झाली होती आणि निवडकर्त्यांनी त्याला या सामन्यातून बाहेर राहण्यास सांगितले आहे. तो आशिया कप संघासाठी देखील स्टँडबायवर आहे आणि तो कोणताही धोका पत्करू इच्छित नाही. आशिया कपनंतर




लगेचच, भारत मायदेशात चार कसोटी सामने खेळेल आणि ऋषभ पंतच्या दुखापतीमुळे अनिश्चिततेमुळे जुरेलला कोणताही धोका पत्करू नये असे सांगण्यात आले आहे.ड्ड्ढ जर जुरेल देशांतर्गत सामने खेळला आणि दुखापत झाली तर गंभीर यांची चिंता वाढू शकते.अलीकडेच भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावरून परतला. या दौऱ्यात खेळली गेलेली पाच सामन्यांची कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत होती. अभिमन्यू ईश्वरन इंग्लंड दौऱ्यावर भारतीय कसोटी संघाचा भाग होता. त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. दुखापतग्रस्त इशान किशनच्या अनुपस्थितीत अभिमन्यू ईश्वरनला पूर्व विभागाचा कर्णधार बनवण्यात आले. सामन्यापूर्वी तो फ्लूने आजारी पडला. ईश्वरनसाठी हा मोठा धक्का आहे. त्याला स्वतः ला सिद्ध करण्याची चांगली संधी होती. अनेक मालिकांमध्ये भारतीय संघाचा भाग असूनही, ईश्वरनला पदार्पण करता आलेले नाही. अशा परिस्थितीत तो धावा काढण्यासाठी उत्सुक होता.जुरेलच्या अनुपस्थितीत मध्य प्रदेशच्या रजत पाटीदारकडे मध्य विभागाची कमान सोपवण्यात आली आहे. पाटीदारच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू () ने आयपीएल २०२५ चे विजेतेपद जिंकले आणि वर्षानुवर्षे सुरू असलेला दुष्काळ संपवला. पूर्व विभागाचे नेतृत्व अष्टपैलू रियान परागकडे आहे, ज्याने या वर्षाच्या सुरुवातीला राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व केले होते.

## राजकीय परिस्थितीसाठी चांगलं असेल तर... राज ठाकरे-उद्धव ठाकरे यांच्या भेटीबद्दल सोनाली कुलकर्णीची प्रतिक्रिया...



**मुंबई** - काही दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे चर्चेत आले आहेत. ५ जुलै २०२५ रोजी झालेल्या मराठी भाषेबद्दलच्या विजयी मेळाव्यात राज आणि उद्धव ठाकरे जवळपास १९ वर्षांनी एकत्र दिसले होते. या विजय मेळाव्यानंतर राज आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटी वाढल्याचं दिसून येत आहे. उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसादिवशी राज ठाकरे मातोश्री बंगल्यावरही गेले होते. त्यानंतर आता गणेशोत्सवानिमित्त उद्धव ठाकरे पहिल्यांदाच राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी गेले होते. गणपती बाप्पाचं दर्शन घेण्यासाठी उद्धव ठाकरे कुटुंबियांसह राज ठाकरेंच्या घरी गेलेले. या खास क्षणांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अशातच आता मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीनं राज आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीबद्दल मत व्यक्त केलं आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीनंतर सामान्यांपासून ते कलाकारांपर्यंत प्रत्येक जण आपलं मत व्यक्त करत आहेत. राज ठाकरे-उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर सोनाली कुलकर्णीनं प्रतिक्रिया दिली आहे. मुंबई तकला दिलेल्या मुलाखतीमध्ये सोनाली कुलकर्णी म्हणाली की, ते काही औपचारिक घोषणा करत नाहीत. तोपर्यंत सगळ्या अफवा आणि चर्चांवर किती विश्वास ठेवावा हे प्रश्नार्थी आहे. पण महाराष्ट्राची संस्कृती तसंच सामाजिक आणि राजकीय परिस्थितीसाठी हे चांगलं असेल तर ते नक्कीच व्हावं आणि कायमस्वरुपी व्हावं.त्याचबरोबर मराठी आणि हिंदी भाषेच्या मुद्द्यावर बोलताना सोनाली म्हणाली की, ड्ड्ढमहाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीसाठी हे उत्तम ठरेल असं वाटतंय. भाषेवरचा, प्रांतावरचा आणि जातिवाद, या सगळ्या गोष्टी होऊ नयेत. घडू नयेत. तरीही आपली भाषा, संस्कृती आणि परंपरा टिकवून ठेवण्यासाठीचे प्रयत्न आपण केले पाहिजेत असंही वाटतं.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या घरीही गणपती बाप्पाचं आगमन झालं असून तिनं आणि भावाने मिळून दरवर्षीप्रमाणे यंदाही घरीच बाप्पाची मूर्ती बनवली आहे. सोनालीने गणपती बाप्पाचे आणि कुटुंबियांचे फोटो शेअर केले आहेत.

# मुलाला जन्म दिला, १५ मिनिटांनी बेशुद्ध पडली, पती डॉक्टरांकडे विनवण्या करत राहिला पण... उपचाराअभावी महिलेचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** येथे प्रस्तुतीसाठी दाखल केलेल्या महिलेचा मृत्यू झाला आहे. उपचार करताना डॉक्टरांनी हलगर्जीपणा केल्यामुळे प्रसुती दरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ही धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगर येथील कुशल मॅटरनिटी होम सिडको एन ७ बजरंग चौक येथे घडल्याची माहिती आहे. या प्रकरणी मयत महिलेच्या पतीने दिलेल्या फिर्यादीवरून सिडको पोलिस ठाण्यात डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दुः खाचा डोंगर कोसळला आहे. डॉ. तपन निर्मल प्रदीप, डॉ. निर्मला आसोलेकर, कुशल मॅटर्निटी होम एन ७ बजरंग चौक सिडको अशी गुन्हा दाखल झालेले आरोपी डॉक्टरांची नावे आहेत. वैभव देविदास खैरे रा. विश्रांती नगर मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रोड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.वैभव खैरे यांनी दिलेल्या फिर्यादीतील माहितीनुसार, श्वेता खैरे या गर्भवती असल्याने ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी फिर्यादीची पत्नी श्वेता खैरे यांना प्रसुतीसाठी कुशल मॅटर्निटी होम येथे दाखल केले होते. श्वेता यांच्यावर उपचार सुरू असताना रुग्णालयातील डॉक्टरांनी काळजीपूर्वक उपचार न करता हलगर्जीपणा केला. त्यामुळे प्रसुतीदरम्यान फिर्यादीच्या पत्नीचा मृत्यू झाला. फिर्यादी मयत श्वेता यांच्या पती वैभव यांनी आरोप पतीने फिर्यादीत केला आहे. संध्याकाळी साडेपाच वाजता या महिलेला रुग्णालयात आणण्यात आलं. त्यानंतर रात्री ९.१५ वाजता या महिलेने एका मुलाला जन्म दिला. प्रसूतीनंतर पत्नीची प्रकृती ठीक होती. तिला दुसऱ्या रुममध्ये हलवण्यात आलं. तेव्हा महिला शुद्धीवर होती. मात्र, पाच-दहा मिनिटांत ती बेशुद्ध पडली. तेव्हा रुग्णालयातील डॉक्टरांना सांगण्यात आलं. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी तिच्यावर काहीही केलं नाही.

त्यानंतर तिला दुसऱ्या रुग्णालयात दाखल करण्यात आली. मात्र, तिथे डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केलं.याप्रकरणी खाजगी रुग्णालयाच्या डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी सिडको पोलिस पुढील तपास करीत आहेत.






या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.मृत्यू झाला तेव्हा नातेवाईकांनी डॉक्टरांवर आरोप करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र नातेवाईकांच्या आरोपावरून डॉक्टरांवर गुन्हा दाखल होत नाही असं पोलिसांनी सांगितलं. गुन्हा दाखल करायचा असेल तर याबाबत समिती नेमून समिती चौकशी करून अहवाल सादर करते अहवाल सादर केल्यानंतर गुन्हा दाखल करू असा आश्वासन देण्यात आलं होतं. नुकताच पोलिसांना डॉक्टरांचा अहवाल मिळाला असून त्यावरून डॉक्टरांविरुद्ध तब्बल वर्षभराने गुन्हा दाखल करण्यात आला आहे

---

# भरधाव टिप्परची स्कूटीला धडक, १५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू; एकाची मृत्यूशी झुंज सुरु..

**वर्धा** : वर्धा शहरातील भगतसिंग चौक येथे गिट्टी भरून शहराकडे येत असलेल्या टिप्परची दुचाकीला धडक लागली. सायंकाळी चार वाजेच्या सुमारास घडलेल्या या अपघातात स्कुटीवरील एका बालकाचा मृत्यू झाला. तर एक १५ वर्षीय बालक गंभीर जखमी झाला आहे. वर्धा शहरातील भगतसिंग चौक येथे गिट्टी घेऊन येत असलेल्या टिप्परची स्कूटीला धडक लागली. यात टिप्परमध्ये समोरून ही स्कूटी बाईक टिप्परच्या समोरच्या भागात शिरली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला असून त्याला सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. गंभीर जखमी झालेल्या युवकाची मृत्यूशी झुंज सुरू असल्याची माहिती आहे. मृतक बालकाचे नाव आयुष संजू मांडवे असं असून तो सावंगी टी पॉईंट परिसरात राहणारा आहे. १५ वर्षाचे वय असून त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर जखमी निखिल प्रफुल मांडवे हा १५ वर्षाचा असून तो द्वारका नगर सावंगी मेघे येथे राहणारा आहे. अपघातात दोन्ही पायाला जबर मार लागला




आहे. त्याची सावंगी रुग्णालयात मृत्युंशी झुंज सुरू आहे. अपघात घडताच भगतसिंग चौकात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. राम नगर पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी टिप्पर जप्त केला असून तपास सुरू आहे.जालना येथे एक मोठा अपघात घडला आहे. टेंभूर्णी-राजूर रोडवरील शिवार परिसरात एका कारचे अचानक नियंत्रण सुटले आणि ती कार विहिरीत जाऊन पडली. या भीषण अपघातात कारमधील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. ही कार एका रुग्णाला उपचारासाठी सुलतानपूरला घेऊन जात होती आणि याच दरम्यान हा अपघात झाल्याची माहिती आहे.जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी-राजूर रोडवरील गाडेगव्हान फाट्याजवळ हा भयंकर अपघात घडला. ह्युंदाई कंपनीची आय २० गाडी फुलंब्री तालुक्यातील गुंगी गेवराई येथून ज्ञानेश्वर भाऊसाहेब डकले, निर्मला सोपान डकले (रा. गुंगी गेवराई),पद्माबाई लक्ष्मण भामीरे, ज्ञानेश्वर लक्ष्मण भामीरे (रा. कोपर्डा ता. भोकरदन) आणि चालक असे पाच जण नातेवाईकासोबत पॅरलेसिस उपचार घेण्यासाठी मेहकर तालुक्यातील सुलतानपूर जाण्यासाठी निघालेले होते.

# पावसामुळे झाडाखाली थांबले, वीज पडून मायलेकासह महिलेचा जागीच मृत्यू

**नागपूर** : शेतात काम करताना वीज कोसळून मायलेकासह तीन जण ठार झाले. ही हृदयद्रावक घटना आज बुधवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास सावनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील धापेवाडाजवळील मडासावंगी परिसरात घडली. वंदना प्रकाश पाटील (वय ४२), त्यांचा मुलगा ओम प्रकाश पाटील (वय २२) व श्रमिक महिला निर्मला रामचंद्र पराते (वय ६३) सर्व रा.धापेवाडा, अशी मृतकांची नावे आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, वंदना, ओम व निर्मला हे तिघे शेतात काम करीत होते. अचानक जोरदार पावसाला सुरूवात झाली. पावसापासून बचावासाठी तिघेही शेतातील एका झाडाखाली गेले. याचदरम्यान वीज कोसळली. होरपळून तिघांचाही घटनास्थळी मृत्यू झाला. शेजारील शेतात काम करणाऱ्या श्रमिकांनी या घटनेची माहिती ग्रामस्थांना दिली. एका ग्रामस्थाने सावनेर पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पंचनामा करून पोलिसांनी तिघांचेही मृतदेह सावनेरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. या घटनेने धापेवाड्यात शोककळा पसरली आहे.गेल्यावर्षी ओम याचे वडील प्रकाश यांना बैलाने लाथ मारली. त्यामुळे ते जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा त्यांचा मृत्यू झाला. प्रकाश यांच्या मृत्यूनंतर पाटील मायलेक दोन एकर शेती करून उदरनिर्वाह करायचे. वंदना व ओमच्या मृत्यूने ओमची बहीण संस्कृतीचे (वय १४) मातृछत्र हरवले आहे. आई व भावाच्या मृत्यूने ती जबर धक्क्यात आहे.





दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांनी आधार, स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

## ऑनलाईन अर्ज १८ सप्टेंबरपर्यंत मागविले...

जनसंचलन/बुलडाणा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासकीय वसतीगृहापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे. अर्जाची प्रक्रिया व निवड या http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण जिल्हा कार्यालय, बुलढाणा येथे सादर करावा. पात्रता : इयत्ता १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले विद्यार्थी, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्याचे प्रमाणपत्र, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व धनगर समाजातील विद्यार्थी पात्र, किमान ६० टक्के (दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के गुण), पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजारांपेक्षा जास्त नसावे, कमाल वय ३० वर्षांपर्यंतच पात्र, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा तसेच कोणत्याही नोकरी/ व्यवसायात नसावा.

# लोकशाही दिन २ सप्टेंबरला...




जनसंचलन/बुलढाणा

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार सप्टेंबर महिन्याचा लोकशाही दिन मंगळवार, दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी कळविले आहे.

# खामगावात लवकरच ओपन जीम आणि जॉगिंग पार्कची निर्मिती

जनसंचलन/ बुलढाणा

शहराच्या विकासाला नवी दिशा देत, नागरिकांच्या आरोग्य संवर्धनावर भर देण्यासाठी खामगाव शहरात लवकरच ओपन जीम आणि आकर्षक जॉगिंग पार्क उभारण्यात येणार आहेत. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर या महत्वपूर्ण उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. हे ओपन जिम खामगाव शहराचे सौंदर्य वाढवण्यासोबतच नागरिकांना निरोगी जीवनशैलीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देतील. शहराला सुव्यवस्थित बनवण्याच्या दृष्टीनेही हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या उपक्रमासंदर्भात नामदार फुंडकर यांनी तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव आणि नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांना आवश्यक निर्देश दिले आहेत. त्यांनी या प्रकल्पांसाठी तातडीने नियोजन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. शासकीय व खाजगी संस्थांचा सहभाग: या प्रकल्पांची अंमलबजावणी तालुका क्रीडा संकुल समितीच्या सहकार्याने केली जाईल. विशेष म्हणजे, यासाठी केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता, विविध सरकारी कार्यालये आणि खासगी संस्थांच्या योगदानातून हे आरोग्यवर्धक प्रकल्प उभे केले जाणार आहेत. यामुळे सार्वजनिक-खासगी भागीदारीचे एक उत्तम उदाहरण खामगावात पाहायला मिळेल. शहरातील मुख्य रस्त्यांवरील चौकांचे सुशोभिकरण केले जाईल आणि तेथे आकर्षक डिझाइनसह सौंदर्याला नवा स्पर्श दिला जाईल. त्याचबरोबर, शहरातील मोकळ्या जागांवर आणि लेआउटमधील ओपन स्पेसमध्ये हिरवळ आणि जॉगिंग पार्क विकसित केले जातील, ज्यामुळे शहरातील वातावरण अधिक सुखद होईल. या उद्यानांचे आणि ओपन जीमचे व्यवस्थापन आणि देखभाल करण्याची जबाबदारी इच्छुक असलेल्या शासकीय, निमशासकीय आणि खासगी संस्थांकडे सोपवली जाईल. यातून, प्रकल्पांची दीर्घकाळ देखभाल सुनिश्चित होईल आणि नागरिकांना या सुविधांचा सातत्याने लाभ घेता येईल. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व: दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व या घोषणेमुळे अधिक अधोरेखित झाले आहे. हा दिवस हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन आहे. या दिवशी देशभरात खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा, मॅरेथॉन आणि खेळाडूंच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन केले जाते. क्रीडा संस्कृती रुजविणे आणि खेळाडूंच्या योगदानाचा गौरव करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. खामगावमधील या उपक्रमामुळे या दिवसाचा उद्देश अधिक सार्थक होईल. खामगावात सुरू होणाऱ्या या अभिनव उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना शारीरिक व्यायामासाठी उत्तम व्यासपीठ मिळेल. धावणे, चालणे आणि इतर शारीरिक हालचालींसाठी सुरक्षित आणि स्वच्छ जागा उपलब्ध होतील. यामुळे नागरिकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल आणि शहराच्या एकूण सौंदर्यातही भर पडेल. या प्रकल्पांमुळे खामगावकरांच्या जीवनशैलीत एक सकारात्मक बदल घडेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# मावशीच्या अंत्यसंस्कारावरून परतणाऱ्या पुतण्याचा मृत्यू दोन तरुणांचा अपघातात करुण अंत!

जनसंचलन/ संग्रामपूर



तालुक्यात काल भीषण अपघात घडला असून यात दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे मृतांपैकी गणेश हरिदास ढोले (३२, रा. पाळोदी, ता. बाळापूर, जि. अकोला) हा आपल्या मावशीच्या अंत्यसंस्काराला आला होता. अंत्यसंस्काराचा कार्यक्रम आटोपून परतीच्या वाटेवरच त्याच्यावर काळाने झडप घातली. दुसरा मृत्यू अजय सुनील लहासे (२२, रा. बावनबीर) या तरुणाचा झाला. ही भीषण दुर्घटना २८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी सहा वाजताच्या सुमारास एकलारावरवट बकाल रस्त्यावर घडली. दोन्ही दुचाकींची समोरासमोर धडक एवढी जोरदार होती की गणेश ढोले व अजय लहासे हे दोघेही जागीच ठार झाले. तर दीपक ढोले पाटील, जहीर खान, गजानन नागळे आणि रवींद्र कोकाटे हे गंभीर जखमी झाले. स्थानिक ग्रामस्थ व मित्रमंडळींनी जीवाचा आटापिटा करून तात्काळ ॲम्बुलन्स आणि खाजगी वाहनांच्या मदतीने जखमींना वरवट बकाल येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर सर्व जखमींना अकोला येथे हलविण्यात आले आहे. अपघातानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून दोघांना मृत घोषित केले. दुर्दैवाने, मावशीच्या अंत्यसंस्काराला आलेल्या गणेशचा अंत्यसंस्कारावरून परत जाताना मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षाचे प्रमाणपत्रांचे वितरण 1 ते ९ सप्टेंबर दरम्यान उमेदवारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा ( ) घेण्यात आली होती. या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी परिषदेकडून ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला होता. सदर परीक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्रे परीक्षा परिषदेकडून जिल्हा शिक्षणाधिकारी(प्राथमिक) कार्यालयास प्राप्त झाली असून, त्यांचे वितरण दि. १ ते ९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत होणार आहे. उमेदवारांनी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी स्वतः उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी(प्राथमिक) विकास पाटील यांनी केले आहे. बुलढाणा जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षा ११ केंद्रांवर घेण्यात आली होती. प्रमाणपत्र प्राप्त करताना उमेदवारांनी स्वतः हजर राहणे आवश्यक असून, त्यांना परीक्षा प्रवेशपत्र, गुणपत्रिका, डी. टी.एड/बी.एड उत्तीर्ण गुणपत्रक, आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, माजी सैनिकांचा पुरावा (लागू असल्यास) तसेच आधार/ पॅन/मतदार ओळखपत्र इत्यादी ओळखपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांशिवाय प्रमाणपत्र दिल्या जाणार नाही. तसेच बुलढाणा परीक्षा केंद्रांवर उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची पेपर-१ व पेपर-२ ची यादी जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ३० वर्षांचा राग! जुन्या प्रकरणाच्या वादातून अमडापूरात थरारक खून

**जनसंचलन/ अमडापूर**

३० वर्षांपूर्वीची एक घटना अखेर जीवघेणी ठरली. अमडापूर पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या खळबळजनक प्रकरणात काशीराम शिवराम कुसळकर (रा. अमडापूर) याने शेजारी गजानन बारकु पवार (रा. हरणी, ता. चिखली) याचा थरारक खून केल्याचे उघड झाले आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत गजानन पवार व आरोपी काशीराम कुसळकर यांच्यात दीर्घकाळापासून वैर होते. तब्बल ३० वर्षांपूर्वी काशीराम कुसळकर याने आपल्या अल्पवयीन मुलीवर गजानन पवार याने अत्याचार केल्याची तक्रार अमडापूर पोलिसांत दिली होती. मात्र, न्यायालयीन सुनावणीनंतर गजानन पवार निर्दोष ठरला. तेव्हापासून आरोपी काशीराम सतत धमक्या देत असे ङ्ङतुला कोर्टाने सोडलं तरी मी तुला जिवंत सोडणार नाहीफ्फ २७ ऑगस्ट रोजी रात्री सुमारास गजानन




पवार आपल्या भावासोबत घरासमोर बसले होते. दरम्यान, तो शौचास जाण्याचे सांगून बाहेर पडला, मात्र बराच वेळ परत न आल्याने घरच्यांनी शोध घेतला. त्यावेळी शेजारील जागेतून काशीराम कुसळकर हा घाईगडबडीत व घाबरलेल्या अवस्थेत बाहेर येताना दिसला. संशय आल्याने घरच्यांनी जागेवर धाव घेतली असता गजानन पवार रक्ताच्या थारोळ्यात, डोक्याला गंभीर जखमा झालेल्या अवस्थेत मृतावस्थेत सापडला. प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले की, जुन्या वैराच्या रागातून काशीराम कुसळकर याने गजानन पवार यांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केला. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. अमडापूर पोलिस ठाण्यात प्रकाश बारकु पवार यांच्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी काशीराम कुसळकरविरुद्ध कठोर कारवाईची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या खुनामुळे ३० वर्षांपूर्वीचे जुनं प्रकरण पुन्हा एकदाच चेंत आलं आहे.

# आमदार सिद्धार्थ खरात यांची सिनेटवर नियुक्ती शिक्षणक्षेत्रात नवा अध्याय सुरू!

**जनसंचलन/ मेहकर**




बुलढाणा जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरणारी बातमी म्हणजे मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०20 मधील तरतुदींनुसार विधानसभेच्या अध्यक्षांना दोन आमदारांना सिनेटवर नियुक्त करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी ही ऐतिहासिक नियुक्ती जाहीर केली. विशेष म्हणजे आमदार खरात यांचा शिक्षणक्षेत्राशी असलेला जुना आणि थेट संबंध या नियुक्तीमुळे पुन्हा अधोरेखित झाला आहे. सन २०१५-१६ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागात सहसचिव पदावर कार्यरत असताना त्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ तयार करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला होता. या अधिनियमामुळे राज्यातील विद्यापीठांना आधुनिक व रोजगाराभिमुख शिक्षणाची नवी दिशा मिळाली. आता त्याच अधिनियमाच्या कक्षेत आमदार खरात स्वतः सिनेट सदस्य म्हणून योगदान देणार आहेत, ही परिस्थिती शिक्षणक्षेत्रात परिवर्तनाची नवी दारे उघडणार आहे. सिनेट हे विद्यापीठाचे सर्वोच्च धोरणात्मक व निर्णय घेणारे व्यासपीठ असून शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या धोरणांत सिनेटचा निर्णायक सहभाग असतो. त्यामुळे सिद्धार्थ खरात यांची नियुक्ती केवळ औपचारिक नसून शिक्षण क्षेत्रातील भविष्यातील निर्णय प्रक्रियेला थेट दिशा देणारी ठरणार आहे. मेहकरच्या जनतेला याचा अभिमान वाटतोय. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रांतून त्यांचे अभिनंदन केले जात असून त्यांच्या कार्यकाळात अमरावती विद्यापीठ आणि त्याच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांच्या शैक्षणिक विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कायद्याची जाण असलेला अधिकारी आता आमदार म्हणून थेट विद्यापीठ धोरण ठरवणाऱ्या पदावर विराजमान झाल्याने, पुढील काळात शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदलांची नांदी या नियुक्तीतून सुरू झाली आहे,यात शंका नाही!

# गोली मार भेंजे मे..असले काम करण्यासाठी दहशत पाहिजे असते..! वाळू माफियाचा व्हिडिओ व्हायरल!

## महसूल मंत्री व शासनाचे नियम टिप्परच्या चाकाखाली!

**जनसंचलन/ चिखली**

अवैध वाळू माफिया ऐवढे मस्तावले की, चक्क नदीपात्रात बोटीद्वारे,जेसीबी द्वारे वाळू उत्खनन करून टिप्पर भरताहेत आणि थेट विक्री करून मालामाल होताहेत. बेकायदेशीर वाळूची चोरी करून शासनाच्या नियमांना टिप्परच्या चाकाखाली तुडवण्याचे काम सर्रासपणे सुरू असल्याचा व्हिडिओ सोशल माध्यमांवर व्हायरल होत आहे.विशेष म्हणजे गोली मार भेजे मे..असले काम करण्यासाठी दहशत पाहिजे असते.. असे गुंड गित व संवादाचा व्हिडिओ चिखली तालुका येथील असल्याचे दिसत असून महसूल व पोलीस यंत्रणा वाळू माफियांवर कारवाई का करीत नाही? लोकप्रतिनिधींच्या मर्जीतील हा प्रकार आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यात वाळू ठेक्यांचे लिलाव झाले नाहीत.पण, शहरासह जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात मोठ्या प्रमाणावर छोटे मोठे बांधकाम सुरू आहेत. त्यासाठी वाळू कुठून येते? हा संशोधनाचा विषय आहे. महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळू माफियांनी मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यातील नद्यांमधून उपसा सुरूच ठेवला आहे. वारंवार कारवाई करूनही हा उपसा सुरू असल्याने लाखो रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागत आहे.चिखली तालुक्यात मोठ्या प्रमाणात बोटीद्वारे व जेसीबी द्वारे वाळू उपसा सुरू असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओ अनेक टिप्पर रस्त्यावरून धावताना दिसत आहेत.महसूल विभागाचे काही नालायक अधिकारी प्रशासनाचा गलेलठ्ठ पगार घेऊनही आपल्या कर्तव्याशी बेईमानी करून कारवाई करीत नसल्याचे दिसून येत असल्याने यंत्रणेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिस व महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या मूकसंमतीनंतर हा व्यवसाय सुरू असल्याचा आरोप होत आहे. काही विशिष्ट! वाहनांवरच कारवाई केली जात आहे. ज्यांना राजाश्रय आहे, त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात पोलिस धजावत नाही.यंत्रणा लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली दिसून येत असल्याचा देखील आरोप होतोय. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी यासंदर्भात कठोर कारवाईचा पवित्र घ्यायला हवा,पोलिस



किंवा महसूल प्रशासनाने सर्वांसाठी समान न्यायाची भूमिका ठेवावी,सदर व्हिडिओ मधील सत्यता पडताळून वाळू माफियांवर कारवाई करण्यात यावी,अशी जनतेची रास्त अपेक्षा आहे.

**आम्ही लवकरच अवैध रेती उत्तखननचा पोस्टमार्टेम करणार कुठल्या रस्त्यावरून कुणाकुणाची टिप्पर चालतात कुठे शेकडो ब्रास रेती साठवून ठेवली लवकरच आपल्या लोकप्रिय चॅनल्स हॅलो बुलडाणा,सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनवर**

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८